PDF Compressor Free Version

Journal of Current Science & Humanities(ISSN: P-2347-7784, E-2347-7792)IP-2.5

||न हि ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विद्यते ||

Chh. Shivaji Shikshan Mandal,Vaduj's

# ARTS & COMMERCE COLLEGE, VADUJ

Tal- Khatav, Dist- Satara(MS)

## One day Interdiciplinary National Seminar on

# Recent Trends in Languages, Literature and Social Sciences

Saturday, 7th July, 2018

## Special Issue

Chief Editor

Dr. S. G. Kamble

Co-Editor's

Prof. S. S Agrawal,
Prof. B. T. Sabale,
Dr. S.M. Patil,
Prof. D. N. Kathare,

Dr. S.S. Kenjle
Prof. V. B. Gujar,
Prof. S. N. Khade,
Dr. S.M. Gire,

| | | | |
|---|---|---|---|
| | THE TEARS OF THE MOON | MANE | |
| 23. | ELECTRONIC RESOURCE IS A BOON FOR E-LEARNERS…..! | ANNAPURE S. G. | 104-107 |
| 24. | RECENT TRENDS IN ENGLISH LANGUAGE TEACHING AND LEARNING | DR. SARANGPANI R. SHINDE | 108-115 |
| 25. | USE OF ENGLISH LANGUAGE IN POST-COLONIAL LITERATURE | SOPHIA AHMAD MULLA | 116-118 |
| **Marathi** | | | |
| 1. | केशव मेश्राम यांची नव्वदोत्तरी कथा | डॉ. प्रभाकर रा. पवार | 119-123 |
| 2. | "ग्रामीण साहित्यिक दि. बा. पाटील यांच्या 'वाल्या' कथासंग्रहातील सामाजिक जाणीवा" | प्रा. डॉ. उदय जाधव | 124-129 |
| 3. | नियतकालीकांचे युग (१८०० ते १८७४) | डॉ. सविता सुनिल केंजळे | 130-134 |
| 4. | प्रतिमा इंगोले यांच्या 'बोडखी' मधील स्त्री दर्शन | प्रा. डॉ. सुलोचना बापू वाघमोडे | 135-138 |
| 5. | 'समकालीन मराठी साहित्यातील सामाजिक जाणीव' (वाङ्मयीन व सामाजिक चळवळींच्या अनु"ंगाने) | डॉ. एन.व्ही. शिंदे, | 139-142 |
| 6. | स्त्री साहित्याची नांदी महदंबा व मुक्ताबाई | प्रा. डॉ. रमेश पोळ | 143-145 |
| 7. | नियतकालीक्-माहिती संप्रेषणाचे एक् प्राथमिक् साध-ा | भारती बी. माने | 146-149 |
| 8. | अस्मितादर्श नियतकालिक — एक वैचारिक चळवळ | प्रा. धनराज आवळे | 150-152 |
| 9. | "अनुवाद एक सृजनशील कला" | प्रा.डॉ. अशोक सदाशिव तवर | 153-158 |
| 10. | 'अनुष्टुभ्' नियतकालिकाचे वाङ्मयीन कार्य | प्रा.डॉ. सागर अशोक लटके | 159-164 |
| 11. | मराठी चित्रपटांतून साकार झालेली मराठी साहित्यातील सामाजिक जाणीव | डॉ. अजित कांबळे | 165-167 |
| 12. | विजया राजाध्यक्ष यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा | शैला आनंदराव क्षीरसागर | 168-169 |
| 13. | वैचारिक साहित्यातील स्त्रीवाद | सालवाडगी शितल संग्राम | 170-176 |
| **Hindi** | | | |
| 1. | २१ वी. सदी के उपन्यासों में ग्रामीण जीवन (संजीवकृत - फॉस उपन्यास के संदर्भ में ) | प्रा.डॉ.बलवंत बी.एस | 177-178 |
| 2. | पंजाब के संपन्न किसान परिवारों की आर्थिक बदहाली की दास्तां: मिले सुर मेरा तुम्हारा | डॉ. एकनाथ श्री. पाटील | 179-185 |
| 3. | कृश्णा सोबती के उपन्यासों में नारी पात्र | प्रा. डॉ. भारती शेळके<br>प्रा. सुवर्णा कांबळे | 186-192 |
| 4. | 21 वी शती के उपन्यासों में ग्रामीण जीवन कृष्णा सोबती के उपन्यासों में चित्रित ग्रामीण जीवन | गीता दिनकर राऊत | 193-195 |
| 5. | किसान कविता में धर्म, रूढ़ी और परंपरा से मुक्ति का प्रश्न | गणेश ताराचंद खैरे | 196-199 |

Website: www.jcsonline.in
JCSH
Journal of Current Science & Humanities
P-ISSN: 2347-7784 e-ISSN: 2347-7792
Impact Factor: 2.05
PDF Compressor Free Version
Proceeding of Interdisciplinary National Seminar on Recent Trends in Languages, Literature and Social Sciences, Saturday, 7th June, 2018

# मराठी चित्रपटांतून साकार झालेली मराठी साहित्यातील सामाजिक जाणीव

डॉ. अजित कांबळे
राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध

मानव हा समाजषिल प्राणी आहे. समाजात एकत्र पध्दतीने जगणे हा माणसाचा स्वभावधर्म आहे आणि अनेक माणसे एकत्र येतात तेव्हा अनेक विचारीही पुढे येतात. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजपर्यंत आपण अनेक सामाजीक समस्यांच्या साखळदंडानी जोडलेलो आहोत. यातील समस्यांचे चित्रण मराठी साहित्यात वेळोवेळी आलेले आहे ज्या पध्दतीने साहित्य हा समाजजिवनाचा आरसा आहे असे म्हटले जाते त्याप्रमाणे चित्रपटही समाजजिवनाचा आरसा आहे असे सांगता येते. कारण चित्रपटाच्या माध्यमातून समाजातील रूढी, परंपरा, यांची जाणीव समाजाला करून देण्याचे काम केले जाते. ज्या पध्दतीने साहित्य हे समाजपरिवर्तन घडवत असते त्याचप्रमाणे चित्रपटही समाजपरिवर्तन घडवत असते सामाजीक, राजकीय, सांस्कृतीक धार्मीक, आर्थीक परीस्थितीनुसार काळानुरूप घडणारे बदल चित्रपटातून दाखवले जातात. चित्रपटाचा निर्माता, दिग्दर्षक, लेखक हे त्या काळाला अनुसरून असे भाश्य चित्रपटातून करताना दिसतात.

भारतीय समाजव्यवस्था ही विभीन्न गटात विभागलेली आहे. या गटातटामध्ये काही वेळा जमातीचे सहकार्य आढळून येते. तर काही वेळा कमालीचा संघर्श दिसून येतो. या भिन्नतेमध्ये या विभागणीला अनेक पदर आहेत. जसे जात, धर्म, वंष, भाशा व लिंगधारीत भिन्नता, जातीजातील जातपंचायत, गुलामगीरी, अपरिहार्यता, लोचटपणा, निर्लजपणा, कमालीचा त्याग असे विविध पदर समाजात अस्तीत्वात आहेत. समाजातील काही प्रष्न केवळ कथा कादंबऱ्यात सांगून ते समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचतील असे नाही. त्यासाठी प्रसारमाध्यमांची आवष्यकता आसते. चित्रपट हे सर्वात प्रभावी असे प्रसारमाध्यम आहे. असे म्हणता येते. या माध्यमांचा वापर करून समाजाला आकृश्ट करून जीवन जगण्याची रीतच यातून समोर येते.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्री पुरूश समानता किंवा लिंगाधारीत भेदावरती मोठ्या प्रमाणात भेदभाव असलेला दिसून येतो. स्त्री पुरूश समानतेच्या गप्पा हा समाज मारत असला तरी प्रत्यक्षात तसे नाही याचा प्रत्यय आपणाला वारंवार येत असतो. त्याचबरोबर स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे व पुरूशांच्या अधिपत्याखाली स्त्रीने रहावे असा विचार आजही समाजात आहे. या विचाराला अनेक स्त्रीया आजही बळी पडतात. या विशयावर आजपर्यंत अनेक कथा कादंबऱ्यातून लेखन झालेले आहे त्याचबरोबर या विशयावर अनेक मराठी चित्रपटांची निर्मीती झालेली पहावयास मिळते. या निबंधामध्ये काही कादंबऱ्यावर अधारीत चित्रपटांचा विचार करण्यात आलेला आहे. यामध्ये अनिरूध्द पूर्नवसू यांची नाही प्रीत पतंगाची खरी या कादंबरीचा व त्यावर अधारीत आहुती या चित्रपटांचा, त्याचबरोबर बा. ग. केसकर यांच्या कुणाच्या खांदयावर या कादबरीचा व त्यावर अधारीत सुर्वता या चित्रपटांचा विचार करणार आहोत.

अनिरूध्द पूर्नवसू यांची नाही प्रीत पतंगाची खरी या कादंबरीच्या कथातनकाचा विचार करू, पुण्याच्या कॉलेजमध्ये अनुसया परांजपे नावाची मुलगी कॉलेजच्या पहिल्या वर्शाला असते. परिस्थितीने गरीब असणारी,

Website: www.jcsonline.in
JCSH Journal of Current Science & Humanities
P-ISSN: 2347-7784 e-ISSN: 2347-7792
Impact Factor: 2.05
Proceeding of Interdisciplinary National Seminar on Recent Trends in Languages, Literature and Social Sciences, Saturday, 7th June, 2018
PDF Compressor Free Version

कॉलेजमध्ये नविनच आलेल्या सप्रेंसरांच्या प्रेमात पडते. अभ्यासाच्या निमित्ताने त्यांच्या रुमवर जाते व आपलं सर्वस्व त्यांना देवून बसते. सरांचे लग्न झालेलं असते हे तीला माहीत नसतं. इकडे अनुला दिवस जातात. तषा परिस्थितीत मनोहर नामक व्यक्तिंषी अनुचे लग्न लावून देते. मनोहरलाही अनुची सर्व परिस्थिती माहीत असते तरीही ते तीची मोठ्य मनाने स्विकार करतात. एक वर्श सुखाचे जाते अनुला मुलगी होते. सहा महिण्यानंतर मनोहर आपले खरं रुप दाखवण्यास सुरुवात करतो अनुला तो आपला मित्र रमाकांत यांच्याबरोबर व्यभिचार करण्यास भाग पाडतो. यासाठी तो मुलगी प्रीयाला तिच्यापासून दूर करण्याची धमकी वारंवार देवू लागतो. मुलीच्या प्रेमापोटी अनू हे सर्व सहन करते. त्यानंतर रमाकांमत तीला आपल्या ऑफीसमध्ये नोकरी देतो आणि हवे तेव्हा षारीरिक सुख घेवू लागतो. त्याच्याबदल्यात मनोहरला पैसे मिळत असतात अनुसुध्दा आपली ईच्छा नसताना हे सर्व सहन करत असते. व आपला संसार चालवित असते. गाडी षिकविण्याच्या निमित्ताने प्रियाषी रमाकांत जवळीक वाढवू लागतो. अनुला हे समजण्यास वेळ लागत नाही. ती मग प्रियाला सप्रेसरांच्याकडे पाठवून देण्याचा निर्णय घेते व एके दिवषी ती पुण्याला सप्रेंकडे तीला पाठवून देते सोबत एक चिठ्ठीही देते. प्रिया पुण्याला सप्रेसरांच्याकडे जाते तेव्हा मनोहर अनुला मारतो व प्रियाचा पत्ता तीला विचारतो पण ती सांगत नाही व षेवटी ती आत्महत्या करते. हे कथातक संपूर्णत: पुरुशी माणसीकतेवरती अधारलेले आहे. आजही आपल्या देषात स्त्रीया या फक्त भोगवस्तू म्हणून वापरल्या जातात. अनुने एक चूक केली आणि तीला तिची मरेपर्यंत षिक्षा मिळाली. स्त्रीया षिकल्या, नोकरी करू लागल्या, मोठमोठ्य हुदयावर काम जरी करत असल्या तरी पुरूशांची त्यांच्याकडे बघण्याची दृश्टी अद्यापही फारषी बदललेली नाही. समाजामध्ये घडत असलेल्या बलात्कारांच्या, छळांच्या, एकतर्फी प्रेमातून होत असलेल्या हत्येच्या घटना पाहील्या की याचा प्रत्यय येतो. हीच संवेदना मराठी साहित्यामधून पाहता येते व चित्रपटातूनही परीणामकारकतेने पाहता येते.

नाही प्रीत पतंगाची खरी या कादंबरीनंतर कुणाच्या खांदयावर या कादंबरीचा विचार याठीकाणी करावयाचा आहे. कुणाच्या खांदयावर ही कादंबरीसुध्दा स्त्रीयांच्या षोशणाचे प्रतितिधीत्व करते. नगर जिल्हयातील एका गावातील मल्हारी नावाच्या ऊसतोड मजूराची ही कथा आहे कारखाण्याच्या या वर्शाच्या सिजनला मल्हारी आपल्या बायकोसोबत, सुर्वंतासोबत जातो. सुर्वंता तरुण व सुंदर आसते त्यामुळे तिच्यावरती सर्वांच्या नजरा रोखून आसतात. मुकादमाच्या मनात ती भरते. सुर्वंता एके रात्री पेंड आणण्यासाठी व मल्हारीने सांगीतले म्हणून जाते त्यावेळी तीच्या असहाय्तेचा फायदा तो घेतो आणि तीच्यावर बलात्कार करतो. सुर्वंता हा प्रकार कोणालाही न सांगता सहन करते आपले मन कामात गुंतवत राहते. अषा प्रकारच्या दररोजच्या कामाने आपण पाहीलेली स्वप्ने पुर्ण होणार नाहीत याची तीला कल्पना असते पण ती काही करुही षकत नाही. त्याचवेळी तेजराम पाटील नावाचा मोठया श्रीमंत व्याक्तिचा मुलगा तिच्या सौदर्यावर व तारुण्यावर भाळतो. तो तिच्याकडे षरीरसुखाची मागणी करतो पण ती सावधपणे पावले उचलण्याचे ठरविते मोका साधून याबाबत ती त्याला विचारते तोही, ती मिळणार या आषेने तीला सर्वोतोपरी मदत करण्याचे आष्वासन देतो. आपल्या मनासारखे काम होणार या आषेने ती तेजरामला आपला

देह त्याला समर्पित करते. षरीर सुखाच्या चटावणीने तो आपल्या वडीलांना सांगून जमिन वाट्यने करण्यास मल्हारीला परवानगी देतो. मल्हारी कामाला गेल्यानंतर किंवा वेळ मिळाल्यानंतर ती तेजरामलाही खुश ठेवत आसते, त्यामुळे सर्वकाही ठीक चाललेलं आसते. पण हळूहळू तिच्या अणि तेजरामच्या संबधाची चर्चा होवू लागते. पण षेवटी व्हायचा तो परिणाम होतो. एक कामगार मल्हारीला सुर्वंता आणि तेजराम यांच्या संबधाबद्दल सांगतो. आपली बायको बदफैली आहे हे समजताच तो रागाने तीला बेषुध्द होईपर्यंत मारतो. त्यावेळी तेजराम हे भांडण सोडवतो पण आपले संबध सुर्वताषी आहेत व ते तिच्या नवऱ्याला समजलेत आणि आता इथूनपुढे आपल्याला सुर्वंताषी जवळीक साधता येणार नाही म्हणून तो आपल्या षेतातील नोकराकरवी मल्हारीला मारुन टाकतो. सुर्वंता, आपल्या नवऱ्याचा हकनाक आपल्यामुळे बळी गेलेला आहे हे पाहून ती वेड्यसारखी वागू लागते व त्या वेडाच्या भरात कारखान्याच्या चरख्यामध्ये स्वत:ला झोकून देते व आपली जीवनयात्रा संपवते. एक कश्ट करणाऱ्या व गरीबीषी झगडणाऱ्या नवरा बायकोची ही कथा मनाला चटका लावून जाते.

वरील दोन्हीही कथेमध्ये स्त्रीयांचे षोशन या समाजाकडून होत आहे याचा प्रत्यय येतो. तरीही आपण स्त्रीयांना समान अधिकार आहेत व तिनेही समाजात स्वत:ला सिध्द करावे हे सांगत आसतो. पण तिच्यासाठी आपण काय करतो हा विचार करणे गरजे आहे. यासाठी कथा कादंबऱ्यातून काल्पनीक स्वरूपात का होईना कथानक मांडले जाते. पण कांदबरी वाचणाने जेवढा समाजमनावर परिणात होणार नाही त्याच्या जास्त प्रमाणात परिणाम हा चित्रपट या माध्यमामुळे होतो कारण चित्रपट हे द्रकश्राव्य माध्यम आहे त्यामुळे कादंबरीपेक्षा त्याचा जादा परिणाम समाजमनावर होतो. चित्रपट हे अडाणी, अषिक्षित, गरीब, श्रीमंत, लहाण, मोठा, स्त्री, पुरूश अषा सर्वांना एकत्रीत पाहता येतात. चित्रपट समजण्यासाठी ऐकू येणे व पाहता येणे इतक्या प्राथमिक गोश्टींची गरज असते. या सर्वांना ती कलाकृती एकाचवेळी पाहता येते. समजून घेता येते व त्यावर चर्चाही करता येते ती जषी कादंबरी वाचताना करता येत नाही. चित्रपट पाहताना वयाचे बंधन असत नाही सर्व वयोगटातील प्रेक्षकांना चित्रपट पाहता येतात. चित्रपट पाहताना आवडलेल्या किंवा नावडलेल्या गोश्टीवर चर्चा करता येते व तेवढे स्वातत्र्य असते. चित्रपट हा सामान्याना समोर ठेवूनच तयार केला जातो. त्यामुळे आषयघनतेबरोबरच रंजनतेलाही महत्व दिलेले असते. करमणूकीच्या माध्यमातून कोणताही विशय मांडता येतो. त्यामुळे समाजाला तो लवकर समजतो व आवडला तर त्यातील चांगले वाईट विचार समाज स्विकारतो. त्यामुळे एक प्रकारची सामाजीक जाणीव समाजापर्यंत पोहचण्यास चित्रपटामुळे हातभार लागतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**संदर्भ**

१.पूनर्वसू अनिरूध्द, (१९९२,) नाही प्रित पतंगाची खरी, मेहता पब्लिषिंग हाऊस, पुणे,
२.डॉ वडिखाये रेखा, (२०१२) महायुध्दोत्तर मराठी कादंबरी, लनाखे प्रकाषन, नागपूर
३.केसकर बा. ग., (१९९४) कुणाच्या खांद्यवर, मेहता पब्लिषिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती,
४. नलगे चंद्रकुमार, (२०१३) ग्रामीण वाड्:मयाचा इतिहास, रीया पब्लिकेषन, कोल्हापूर